सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/ प्र. क्र. १११/ पोल-३, दिनांक २४/०३/२०२६

**विषय :-** राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे.पीडब्ल्युसी कंपनीस मार्च २०२५ ते सप्टेंबर २०२५ मध्ये केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१११/पोल-३, दिनांक २४/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२४१८२५४६४५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 25-03-2026 17:25:35

(चंद्रशेखर शिंदे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.)(अति कार्यभार),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १७

प्रत,

पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा

**राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी कंपनीस मार्च २०२५ ते सप्टेंबर २०२५ मध्ये केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण३६२५/प्र.क्र.१११/ पोल-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २४.३. २०२६

<u>वाचा:</u>

१. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ वरील दि.१३.०८.२०१४, दि.२१.१०.२०१५, दि.२४.०२.२०१६, दि.२१.०९.२०१६, दि.३०.११.२०१६, दि.१४.१२.२०१८, दि.११.०२.२०१९ व दि.०४.०३.२०१९ रोजीचे आदेश.
२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.५३९/१९८६ वरील दि.२४.०७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.
३. माहिती तंत्रज्ञान विभाग व मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि.यांच्या दरम्यान झालेला करार दि.२०.३.२०१८.
४. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय क्र. GAD-मातंस ०८०/४/२०१४- O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH), दि.०१.०७.२०१४, दि.१९.०७.२०१७, दि.०९.१०.२०१७, दि.२०.०३.२०१८, दि.०९.०५.२०१९, दि. २४.४.२०२३. व दि.५.१०.२०२३
५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी ३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.१४.११.२०१९.
६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी ३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.११.१२.२०१९.
७. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.०३.०२.२०२१.
८. शासन निर्णय क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.०१.०८.२०२२.
९. शासन निर्णय क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.१२.७.२०२३,
१०. शासन निर्णय क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.१.११.२०२३.
११. शासन निर्णय क्र.सीसीटी ३६२०/प्र.क्र.०४/भाग-१/पोल-३, दि.१३.१२.२०२३.
१२. शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/E-७४८५२०/भाग-२/पोल-३,दि.२१.३.२०२४, दि.३०.३.२०२४, दि.१०.७.२०२४, दि. २८.८.२०२४, दि.२४.२.२०२५, दि. २९.३.२०२५, दि.२२.९.२०२५.
१३. मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर्स प्रा.लि., यांचे दि.२२.७.२०२५, दि.२९.८.२०२५ व १.१०.२०२५ रोजीचे पत्र.
१४. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांचे पत्र क्र. पोमसं/१७/प्रकल्प सल्लागार पीडब्ल्युसी देयके-मुदतवाढ/१०२/२०२३, दि.२०.११.२०२५.
१५. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५
१६. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५

<u>प्रस्तावना</u> :-

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यास संदर्भाधीन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२०.१२.२०१९ च्या पत्रान्वये राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. पीडब्ल्युसी या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली असून सदर कंपनीस पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत कार्यादेश

देण्यात आले. संदर्भ क्र.७ येथील शासन निर्णयान्वये मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या ६ वरिष्ठ सल्लागारांना १ Man-month साठी Milestone तत्वावर दि.१५.१०.२०२० ते प्रकल्प पुर्णपणे कार्यान्वित (Go-live) होईपर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली होती. तसेच राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतच्या प्रकल्पासाठी सल्लागारांना मुदतवाढ देण्यामध्ये खंड पडला असल्याकारणाने संदर्भ क्र.८ येथील शासन पत्रान्वये प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कंपनी यांना कार्यादेश देण्यात आले व संदर्भ क्र.९ येथील शासन पत्रान्वये मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या १ वरिष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांना दि.१९.९.२०२३ पर्यंत Man-month तत्वावर नियुक्ती देण्यात आली आहे. तदनंतर राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्पाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि.,या कंपनीच्या एक सल्लागार व एक सहयोगी सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.२०.९.२०२३ ते दि.३१.३.२०२४ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ संदर्भ क्र. १२ येथील दि.२१.३.२०२४ रोजीच्या शा.नि. अन्वये देण्यात आली आहे. तदनंतर दि.१०.७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१.४.२०२४ ते ३.६.२०२४ अखेर दोन सहयोगी सल्लागारांना मुदतवाढ देण्यात आली. तदनंतर दि.२८.८.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१.७.२०२४ ते ३०.९.२०२४ अखेर दोन सहयोगी सल्लागारांना प्रकल्पाच्या फेज-१ व फेज-२ च्या कार्यान्वयन व व्यवस्थापनासाठी मुदतवाढ देण्यात आली तसेच एक वरिष्ठ सल्लागार व एक सल्लागार यांना निविदा प्रक्रीया व्यवस्थापनासाठी प्रकल्पाच्या फेज-३ (विस्तार) च्या साठी आर.एफ.पी. प्रसिध्द झाल्यानंतरच्या ३ महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही Operation Management of Phase 1 & 2 of the Project साठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि., या कंपनीच्या दोन सहयोगी सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.१.१०.२०२४ ते दि.३०.९.२०२५ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उक्त नमूद दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्यात आली, व Bid Process Management – Phase 3 (Expansion Phase) of the project साठी एक वरिष्ठ सल्लागार व एक सल्लागार यांना टप्पा ३ ची RFP प्रकाशित झाल्यानंतर दि.१.१०.२०२४ ते दि.३०.९.२०२५ पर्यंत नेमणूक करण्यास दि.२४.२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली.

संदर्भ क्र.१२ येथील शासन निर्णयान्वये मे. प्राईस वॉटरहाऊस कुपर्स प्रा.लि. या कंपनीने राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून दि.१.१०.२०२४ ते दि.२८.९.२०२५ मध्ये केलेल्या कामाबाबत रु.६२,८५,१६५/- ची देयके दि.२२.९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अदा करण्यात आली आहेत.

आता संदर्भ क्र.१४ येथील पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक (नि. व. स.) यांनी प्रकल्प सल्लागार मे. पीडब्ल्युसी कंपनीच्या सल्लागारांचे मार्च २०२५ ते सप्टेंबर २०२५ मध्ये केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत शासनास विनंती केली आहे. त्यानुसार सदर देयक अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी मे. पीड्ब्ल्युसी कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासन निर्णय, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय क्र.GAD-मातंस ०८०/४/२०१४-O/O माहिती तंत्रज्ञान संचालनालय, दि.५.१०.२०२३ अन्वये निश्चित केल्यानुसार त्यांना मानधन अनुज्ञेय करण्यात आले आहे. त्यानुसार राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे

बसविण्यासाठी मे.पीड्ब्ल्युसी कंपनीने मार्च २०२५ ते सप्टेंबर २०२५ मध्ये सल्लागाराच्या कामासाठी खालील तपशिलप्रमाणे (मानधन, इतर खर्च व वस्तू आणि सेवा कर मिळून) **रु.९८,७४,६९७/-** (रुपये अठ्ठ्याण्णव लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे सत्त्याण्णव फक्त) इतक्या रकमेचे देयक मे.पीड्ब्ल्युसी कंपनीस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

| **Month** | **Resource Name** | **Billing Designation** | **Man Month Rate for the mentioned period** | **Deployment %** | **Applicable Amount per Resource for the mentioned period** | **Total Applicable Amount (Excl. GST)** | **GST @ 18%** | **Total Amount (Incl. GST)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A** | **B** | **C** | **D** | **E** | **F = D * E** | **G** | **H = 18% of G** | **I = G + H** |
| March 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | 13,00,000 | 2,34,000 | 15,34,000 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Makrand Chougule | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Srabanti Das | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| April 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | 13,00,000 | 2,34,000 | 15,34,000 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Makrand Chougule | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Srabanti Das | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| May 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | 13,00,000 | 2,34,000 | 15,34,000 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Makrand Chougule | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Srabanti Das | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| June 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | 10,15,000 | 1,82,700 | 11,97,700 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Makrand Chougule | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| July 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 94% | 3,60,161 | 9,45,645 | 1,70,216 | 11,15,861 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 87% | 3,00,483 | | | |

| Month | Resource Name | Billing Designation | Man Month Rate for the mentioned period | Deployment % | Applicable Amount per Resource for the mentioned period | Total Applicable Amount (Excl. GST) | GST @ 18% | Total Amount (Incl. GST) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A** | **B** | **C** | **D** | **E** | **F = D * E** | **G** | **H = 18% of G** | **I = G + H** |
| | Shubham Ande | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| August 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 87% | 3,35,322 | 12,41,129 | 2,23,404 | 14,64,533 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 100% | 3,45,000 | | | |
| | Shubham Ande | Associate Consultant 1 | 2,85,000 | 97% | 2,75,806 | | | |
| | Suresh Appaiahgari | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| September 2025 | Piyush Chavan | Senior Consultant | 3,85,000 | 100% | 3,85,000 | 12,66,612 | 2,27,990 | 14,94,603 |
| | Sunny Kandre | Consultant | 3,45,000 | 90% | 3,11,612 | | | |
| | Shubham Ande | Associate Consultant 1 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| | Suresh Appaiahgari | Associate Consultant 2 | 2,85,000 | 100% | 2,85,000 | | | |
| **Total** | | | | | | **83,68,386** | **15,06,310** | **98,74,697** |

२. अ) उपरोक्त रकमा संदर्भ क्र.४ मध्ये नमुद शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार सीसीटीव्ही प्रकल्पासाठी सल्लागारांना दरमहिना दरमाणुस (Man-Month) तत्वानुसार अदा करण्यात येत आहे.

ब) संदर्भ क्र.१३ अन्वये मे. पीड्ब्ल्युसी कंपनीने सादर केलेल्या देयकानुसार सदर रक्कम देण्यात येत आहे. सदर रकमेमध्ये १८% वस्तू आणि सेवा कर समाविष्ट करण्यात आला आहे.

क) सीसीटीव्ही प्रकल्पासाठी संबंधित कंपनीला सल्लागारांच्या मानधनापोटी जादा रक्कम अदा केली आहे असे निदर्शनास आल्यास अशी जादा रक्कम संबंधित कंपनीकडून समायोजीत करण्याचा अधिकार शासनास राहील.

ड) सदर देयके आयकर व इतर प्रचलीत कर वजाती करून अदा करण्यात यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च “मागणी क्र.बी-१०, ४०५५-पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे, (४०५५ ०२२३), १३-कार्यालयीन खर्च” या लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आले आहे. तर त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला “आहरण व संवितरण

अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आले आहे. देयके अदा करण्यात आल्यानंतर निधी उपयोगिता प्रमाणपत्रे शासनास सादर करावीत.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार, मधील अनुक्रमांक ११ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार तसेच प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार त्याचप्रमाणे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५ अनुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४.७.२०२५ अनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या निधी वितरणास वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१९९/२०२६, व्यय-७, दि.११.३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३२४१८२५४६४५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.24 18:26:37 +05'30'

**( रा.ता.भालवणे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
३. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि., २५२, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०००२८.
८. कार्यासन अधिकारी (व्यय-७/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती / पोल-३.